**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** जवाहर नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0328 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/08/2026 22:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 05/08/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/08/2026

**Time From (वेळेपासून):** 15:01 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:01 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/08/2026 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 055

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/08/2026 21:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 500 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महानगर पालीका झोन क्र 07,छ संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): चैनसिंग सांडुसिंग गुसिंगे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिंबधक,विभाग ,छ संभाजीनगर,जवाहर नगर,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरिक्षक लाचलुचपत प्रतिब,विभाग,छ संभाजीनगर,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9823018740

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कुणाल मनोहर कविकर | | | 1. प्लट क्र 102, गजानन नगर, गारखेडा परिसर,छ संभाजीनगर, जवाहर नगर,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रूपये दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी चैनसिंग सांडुसिंग गुसिंगे, वय 45 वर्ष, व्यवसाय नोकरी, पोलीस निरिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9823018740.
मी सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन मागील दोन वर्षापासुन छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस निरिक्षक म्हणुन नेमणुकीस आहे. दिनांक 31/07/2026 रोजी मा.पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी आम्हाला आदेशीत केले की, एक तक्रारदार असुन त्यास संपर्क करून त्याची तक्रार सविस्तर ऐकुण घ्यावी व त्यावर नियमानुसार कायदेशीर कारवाई करावी, मा.पोलीस अधिक्षक ला.प्र.वि छत्रपती संभाजीनगर यांचे आदेशानुसार आम्ही प्रथम तक्रारदार यांना मा.पोलीस अधिक्षक ला.प्र.वि छत्रपती संभाजीनगर यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांक 9021595698 संपर्क केला असता त्यांनी आम्हाला त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणी संबंधी थोडक्यात माहीती दिली. तसेच त्यांनी दिनांक 05/08/2026 रोजी मला माझ्या मुलाचे जन्म प्रमाणपत्रासाठी बोलावले आहे. मी आपल्याला प्रत्यक्ष भेटुन तक्रार देतो असे तक्रारदार यांनी त्यावेळी कळविले. त्यावरून आम्ही शासकीय पंचांची सेवा उपलब्ध करून घेतली.त्यानंतर दिनांक 05/08/2026 रोजी तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9021595698 वरून आम्हाला संपर्क केला असता आम्ही त्यांना सांगितले की, आम्ही शासकीय पंच व सापळा पथक असे आपणास सुरक्षीत ठिकाणी भेटण्यास येतो आणि त्याच ठिकाणी तुमची लेखी तक्रार घेऊ असे सांगितले. त्यांनतर आम्ही दिनाक 05/08/2026 रोजी दोन शासकीय पंच तसेच सापळा पथक यांना आमचे कक्षा मध्ये बोलावुन त्यांना सुचना केल्या व लाचलुचपत प्रतिबधंक विभाग छत्रपती संभाजीनगर येथुन 11.30 वाजता आम्ही दोन शासकीय पंच, सापळा पथक असे सापळा कारवाई कामी लागणारे सर्व साहित्या सह तक्रारदार यांनी सांगितलेल्या सुरक्षीत ठिकाणी शासकीय वाहन क्रमांक MH-20 HN-9639 ने रवाना झालो. आम्ही तक्रारदार यांनी सांगितलेल्या ठिकाणी पोहचल्यानंतर काही वेळाने एक चार चाकी वाहन आमच्या गाडीजवळ येऊन थांबले व त्यामधुन एक इसम उतरून आमचेकडे आला व त्यांनी आम्हास आपण गुसिंगे साहेब आहात का असे विचारले, तसेच मी तक्रारदार आहे असे सांगितले, त्यावरून आम्ही त्यांना आमचा व दोन शासकीय पंच तसेच सापळा पथक यांचा परिचय करून दिला व त्यांना होणाऱ्या लाच मागणीची तक्रार देणे बाबत सांगितले असता त्यांनी त्यांना होणाऱ्या लाच मागणीची तक्रार आमचे व दोन पंचा समक्ष दिली.
मी संजय विठ्ठलसिंग जारवाल, वय 38 वर्ष, व्यवसाय नौकरी, रा.संजरपूरवाडी ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर. मो.नं 9021595698.
समक्ष हजर राहुन तक्रार देतो की, मी वरील प्रमाणे असुन माझ्या मुलाचे जन्म नोंद प्रमाणपत्र काढण्यासाठी मला लाच मागणी होत असल्यामुळे मी दिनांक 31/07/2026 रोजी S.P मॅडम अँन्टी करप्शन यांना फोनव्दारे माहीती दिली होती. त्यानंतर मला ऍन्टी करप्शन येथील P.I गुसिंगे साहेबांचा फोन आला होता. तेव्हा गुसिंगे साहेबांनी मला S.P मॅडम यांनी आपल्या सोबत होत असलेल्या लाच मागणी संदर्भाने विचारपुस केली तेव्हा मी P.I गुसिंगे साहेबांना सांगितले कि, मला माझ्या मुलाचे जन्म प्रमाणपत्र काढुन देण्यसाठी सहा हजाराची लाच मागणी होत आहे. तसेच संबंधीत कुणाल कविकर हया व्यक्तीने मला लाच रक्कम घेऊन दिनांक 05/08/2026 रोजी त्याचे कार्यालयात बोलावले आहे. तेव्हा मी आपल्याकडे येऊन प्रत्यक्ष तक्रार देतो असे कळविले होते.
आज दिनांक 05/08/2026 रोजी मी P.I गुसिंगे साहेबांना संपर्क करून महानगर पालीका झोन -07 छत्रपती संभाजीनगर येथे सुरक्षीत ठिकाणी येवुन PI गुसिंगे साहेबा समोर प्रत्यक्ष भेटुन तक्रार देतो की, मी दि

10/07/2026 रोजी माझा मुलगा आदित्य जारवाल वय 6 वर्ष याचा जन्म प्रमाणपत्र मिळणे करिता म.न.पा. झोन क्र 07 येथे अर्ज दिला होता. तेव्हा संबंधीत कार्यालयात हजर असलेले कुणाल कविकर यांनी मला मुलाचे जन्म प्रमाणपत्र 15-20 दिवसात मिळेल असे सांगितले होते. तसेच जन्म प्रमाणपत्र काढण्यासाठी 6,000/- रूपये लागतील असे सांगितले होते. तसेच सदर पैसे हे शासकीय फिस नसल्याचे त्यांनी मला सांगितले होते. त्यानंतर माझी खात्री झाली की, जन्म प्रमाणपत्रा करिता मागत असलेले 6000/- रूपये हे लाचेची रक्कम आहे. म्हणुन मी SP मॅडम ऍन्टी करप्शन यांना फोनव्दारे माहीती दिली होती.तसेच कुणाल कविकर हे मला पैसा घेवुन या व जन्म प्रमाणपत्र घेऊन जा असे वारंवार सांगत आहे.

आज दि 05/08/2026 रोजी मी म.न.पा झोन 07 येथील कुणाल कविकर यांना भेटण्यसाठी जाणार आहे. त्यांनी माझ्या मुलाचे जन्म प्रमाणपत्र काढुन देण्यासाठली लाचेची मागणी केल्यास त्याचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करावी.

श्री.कुणाल कविकर व माझा कोणताही उसणवारीचा व्यवहार नाही तसेच वैर अगर दुश्मनी नाही. माझा वरील जबाब माझ्या सांगण्या प्रमाणे बरोबर व खरा आहे. तक्रारदार यांनी सोबत जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत महानगर पालीका झोन -7 छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचे कामासाठी दिलेल्या अर्जाची प्रत दिली आहे. अशी लेखी तक्रार दिल्याने पंचांची खात्री झाल्यावर पंचांनी व आम्ही त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 05/08/2026 रोजी महानगर पालीका झोन क्र-7 छत्रपती संभाजीनगर येथे तक्रारदार यांना त्यांच्या कामासाठी अभि.कथित लोकसेवक श्री. कुणाल कविकर हे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत तक्रारदार पंच क्रमांक 1. श्री.सुर्यवंशी यांना महानगर पालीका झोन क्र-7 छत्रपती संभाजीनगर येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय तक्रारदार, शासकीय पंच व सापळा पथक पो.अं नंदिले पो.अं बारसे यांचे समक्ष घेतला. त्यानंतर आम्ही दोन शासकीय पंच,सापळा पथक असे शासकीय वाहन क्रमांक MH-20 HN-9639 या चारचाकी वाहनाने तसेच तक्रारदार हे त्यांचे कडील चार चाकी वाहन क्रमांक MH-20 HB-3205 ने सुरक्षीत ठिकाणी छत्रपती संभाजीनगर येथुन सुमारे 13.30 वाजता महानगर पालीका झोन क्र-7 छत्रपती संभाजीनगर जवळील सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी रवाना झालो. महानगर पालीका झोन क्र-7 छत्रपती संभाजीनगर जवळील सुरक्षीत ठिकाणी पोहचल्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल, यांना व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. आमच्या सुचनेवरुन पो.अ बारसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये SanDisk कंपनीचे 16 जी.बी क्षमतेचे नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल व पंच क्रमांक-1 श्री.सुर्यवंशी यांना महानगर पालीका झोन क्र-7 छत्रपती संभाजीनगर येथे अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे कडील चार चाकी वाहन क्रमांक MH-20 HB-3205 ने 14.06 वाजता रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक -1 श्री.सुर्यवंशी हे 14.24 वाजेच्या सुमारास अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांची भेट घेऊन आम्ही थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आले.

आमच्या सुचनेवरुन पो.शि/बारसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन आमच्या ताब्यात दिले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथकातील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर व तक्रारदार श्री.संजय जारवाल यांचे लाचमागणी पडताळणी महानगर पालीका झोन क्र-7 छत्रपती संभाजीनगर येथे झालेली असुन त्यामध्ये तक्रारदार व अभि.कथित लोकसेवक श्री. कुणाल कविकर यांचे झालेले संभाषण त्यात तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले नमस्कार सर, झालं का,अभि. कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर, म्हणाले वाचून घ्या एकदा तक्रारदार श्री.संजय जारवाल त्यांना म्हणाले सर हे झेरॉक्स हे ना, अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर म्हणाले याच्यावर स्टॅम्प बाकी हे आजून, तेव्हा तक्रारदार श्री.संजय जारवाल त्यांना म्हणाले सर, अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर म्हणाले कॅश हे का ऑनलाईन:, तेव्हा तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले, आ, तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर, म्हणाले ऑनलाईन हे का कॅश हे, तेव्हा तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले ऑनलाईन नई हे एटीएम मधून काढावा लागन माला मी आता डायरेक्ट आलो पाव्हणे पण होते आपल्या संग त्यानंतर अभि.कथित लोकसेवक श्री. कुणाल कविकर, म्हणाले ऑनलाईन नई का तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले इथ एटीएम हाय का कुठ मग तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर, म्हणाले नंबर वरच मागुन घ्याना ऑनलाईनच मागून घ्या. तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले चालन चालन अं कितीक सांगु पाहुण्याला, तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री. कुणाल कविकर, म्हणाले पाच, तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले पाच तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री. कुणाल कविकर, म्हणाले रिजेक्ट करुन टाकल त्यांनी परत इंट्री केली काल कालच्या काल अप्रुव्हल घेवून आलो

तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले पाच पाच हजार द्यायचे का मग पाच हजार काही कमी कराणा थोड तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर, मला फीस पण भरायची त्याच्यात साडे चारशे रुपये फीसच जाईन मला काय चार पाचशे रुपये उरत्या फक्त जास्त काहीच नई सांगत तुम्हाला तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले इठे कुठ हे एटीएम कुठ हे मग, तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर, म्हणाले इकड, तक्रारदार श्री. संजय जारवाल म्हणाले समोर हे का इकड बोलवून घेतो मग मी थोडशेक कमी तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री. कुणाल कविकर, म्हणाले मला शंभर दोनशे कमी द्यायचे तर द्या त्यावर नई करता येणार मला काय तीन चारशे रुपये राहतीन त्याच्यावर काय अजुन काय सांगावा परत फीस पण भरण हे माला, तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले ठीक हे तुम्हाला चला येतो मी तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर, म्हणाले चला मी आत मधीच हे श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल व अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांच्यामध्ये तक्रारदार श्री. श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता त्यांनी महानगर पालीका झोन क्र 7 छत्रपती संभाजीनगर येथे अर्ज दिला होता. तक्रारदार यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांनी ते काम करत असलेले महानगर पालीका झोन क्र-7 येथील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन तक्रारदार यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्राचे काम करून देण्यासाठी 5,000/-रू लाचेची मागणी पंचासमक्ष करून 5000/-रू लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले असल्याचे निष्पण झाले.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल व दोन्ही पंचांना अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले तसेच वेळे अभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. संजय विठ्ठलसिंग जारवाल व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असले बाबत खात्री करुन दिली. नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. आम्ही त्यानंतर तक्रारदार यांना सापळा करवाईसाठी लागणारे 5,000/-रु हजर करण्याचे सांगितले तेव्हा त्यांनी 500/-रु दराच्या 10 नोटा आमच्या समक्ष हजार केल्या, सदर नोटांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 श्री. सुनिल हिवराळे यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास पोअं/नंदिले यांनी ऍ्थ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल यांचे शर्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. आम्ही तक्रारदार यांना अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 5,000/-रु. काढुन अभि.कथित लोकसेवक कुणाल कविकर सदर फिर्याद 8000 पेक्षा जास्त शब्द असल्याने उर्वित फिर्याद पुढील पानावर घेत आहे..

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sachin laxman kumbhar(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Registered by (नोंदणीकारअधिकारी)
Signature of Officer in charge,
Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): sachin laxman kumt
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PI

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

FIR पान क्रं. 5 पासुन पुढे उर्वित फिर्याद

यांना द्याव्यात व त्यानंतर खिशामध्ये ठेवलेला रूमाल काढुन तोंड पुसावे असा इशारा नेमुन दिला. त्यानंतर तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे पँटचे खिशामध्ये ठेवलेला रूमाल काढुन तोंड पुसावे असा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर सुरक्षीत ठिकाणाहुन पंचांसमक्ष सापळा कारवाईचे अनुषंगाने आमच्या आदेशाने पो.अ.बारसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जी.बी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 14.56 वा चालु करुन ते तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल यांचे गळयात अडकवुन तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल व पंच क्रं 1. श्री. जयंत सुर्यवंशी यांना सापळा कारवाई कामी त्यांचे कडील चार चाकी वाहन क्रमांक MH-20 HB-3205 ने अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांची भेट घेणे कामी महानगर पालीका झोन क्र 07, छत्रपती संभाजीनगर येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथक असे आमचेकडील शासकीय वाहनाने महानगर पालीका झोन क्र 7, छत्रपती संभाजीनगर येथे आडोशाला जावुन तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 हे अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांची भेट घेण्यासाठी महानगर पालीका झोन क्र 07 छत्रपती संभाजीनगर येथे जातांना दिसले. त्यानंतर तक्रारदार हे अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांचे सह महानगर पालका झोन क्र 07 छत्रपती संभाजीनगर कार्यालयाचे बाहेर येवुन बाजुला चर्चा करतांना दिसले. तक्रारदार यांनी पथकास दिसेल अशा रितीने यांना त्यांचे पँटचे खिशामध्ये ठेवलेला रूमाल काढुन तोंड पुसाले अभि.कथीत लोकसेवक श्री.कुणाल कविकर याने पैसे स्विकारल्याचा 15.01 वा नियोजीत इशारा केला. सदर इशारा समजुन आम्ही, पंच क्रं.2 व सापळा पथक सक्रीय होवुन आम्ही तक्रारदारास सोबत घेवुन अभि.कथित लोकसेवक कुणाल कविकर, यांना महानगर पालका झोन क्र 07 छत्रपती संभाजीनगर कार्यालयाचे बाजुस असलेल्या हॉटेल मधुशाला बार आणि रेस्टॉरंट समोरून ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पो.अं बारसे यांनी तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद करून आमचे ताब्यत दिले. त्यानंतर अभि.कथित लोकसेवक कुणाल कविकर यांना ताब्यात घेऊन महानगर पालीका झोन क्र 07, छत्रपती संभाजीनगर येथील ते बसत असलेल्या टेबलवर जाऊन तेथे त्यांना बसवण्यात आले. त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचे समक्ष पंच क्रं.1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं.1 याने सांगीतले की, मी व तक्रारदार असे अभि.कथित लोकसेवक कुणाल कविकर यांची भेट घेण्यासाठी महानगर पालीका झोन क्र-7 छत्रपती संभाजीनगर येथे गेलो असता, ते महानगर पालीका झोन क्र-7 छत्रपती संभाजीनगर येथील भेटले त्यानंतर तक्रारदार श्री.संजय जारवाल यांची व श्री.कुणाल कविकर यांची कामासंदर्भात चर्चा झाली. कुणाल कविकर हे त्यांना घेऊन महानगर पालीका झोन क्र 07, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाचे बाहेर आले व कार्यालयाचे बाजुला तक्रारदार व श्री.कुणाल कविकर यांची कामासंबंधी

डिउटी अधिकारी
पो.स्टे. जवाहरनगर
छत्रपती संभाजीनगर

चर्चा झाली अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांनी पैशाबाबत विचारुन लाचेची रक्कम स्वता: स्विकारली. त्यांनी ती त्यांच्या पँन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदाराने नियोजीत इशारा केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र 1 यांनी दिलेल्या माहिती प्रमाणेच वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील तक्रारदार, श्री.संजय जारवाल आणि अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार संजय जारवाल म्हणाले **ते घ्याना** अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर म्हणाले **हा इकडंच ठेवलं हे,** तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले **पाच हे बर का तुम्ही सांगले त्या हिशाबाने देवू राहीले पाच हजार बर का,** अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर म्हणाले **मी तुम्हाला पैशे भरली त्याची पावती व्हॉट्स अप करतो,** तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले **ती कितीची पावती हे,** अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर म्हणाले **ती आता ऑनलाईन दोनशे, आडीचशे, तीनशे काय आसन ते** तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले **तेवढी येईल का,** अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर म्हणाले **हा ते ऑनलाईन भरव लागत ऑनलाईन त्याच्यासाठी केले हे आपण** तक्रारदार श्री.संजय जारवाल म्हणाले **चालन** असा तक्रारदार श्री. संजय विठ्ठलसिंग जारवाल व अभि.कथित लोकसेवक श्री.कुणाल कविकर यांचे मध्ये झालेल्या संभाषणामध्ये आरोपी श्री.कुणाल कविकर यांनी लाचमागणीची रक्कम स्विकारलेली आहे. यावरुन आरोपी श्री.कुणाल कविकर यांनी तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र महानगर पालीका झोन क्र 07 छत्रपती संभाजीनगर येथुन काढुन देण्यासाठी महानगर पालीका झोन क्र 07 येथील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन आरोपी श्री.कुणाल कविकर यांनी तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल यांचे कडुन लाचेची रक्कम 5,000/-रूपये स्वत: स्विकारल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही पंचासमक्ष महानगर पालीका झोन क्र 07, छत्रपती संभाजीनगर येथे बसवलेल्या इसमास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कुणाल मनोहर कविकर, वय 27 वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी, रा.प्लॉट क्र 102, गजानन नगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख करुन देवुन लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्यांनी त्यांच्या पँटच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशा मध्ये ठेवल्याचे दिसून आले. तेव्हा सदरची लाचेची रक्कम पंच क्रं.2 यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन सापळा पुर्व कारवाई वेळी तक्रारदार याचे कडे दिलेल्या नोटांच्या क्रमांकाची खात्री करता त्या त्याच क्रमांकाच्या नोटा असल्याचे दिसुन आले. तसेच पंचासमक्ष अल्ट्राव्हॉयलेट प्रकाशाचे उजेडात सदरच्या नोटा तपासल्या असता त्यावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदरची लाचेची रक्कम, आरोपी श्री.कुणाल मनोहर कविकर यांनी अंगावर परिधान केलेल्या पँन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवल्या असल्याने त्यांचे पँन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशावर अल्ट्राव्हॉयलेट प्रकाशाचे उजेडात पाहणी केली असता, त्यावर ठिक-ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यांनतर आरोपी

श्री.कुणाल मनोहर कविकर यांचे कडुन लाचेची रक्कम 5,000/- रुपये व त्यांचे कडील मोबाईल ताब्यात घेतला तसेच तक्रारदार श्री.संजय जारवाल यांचे मुलाची जन्म प्रमाणपत्राची प्रत पंचासमक्ष जप्त केले आहे. तसेच आरोपी खाजगी इसम श्री.कुणाल मनोहर कविकर यांना ताब्यात घेवुन त्यानंतर पुढील कारवाईकामी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे येवुन पंचनामा पुर्ण केला आहे.

तरी दि. 05/08/2026 रोजी महानगर पालीका झोन क्र 07, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी यातील मुळ तक्रारदार श्री.संजय विठ्ठलसिंग जारवाल, वय 38 वर्ष, व्यवसाय नौकरी, रा.संजरपुरवाडी ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर.यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी श्री. कुणाल मनोहर कविकर, वय 27 वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी, रा.प्लॉट क्र 102, गजानन नगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर यांनी ते काम करत असलेल्या महानगर पालीका झोन क्र 07, छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन तक्रारदार श्री.संजय जारावाल यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी 5,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. दिनांक 05/08/2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक 05/08/2026 रोजी लाचमागणी पडताळणी केली असता यातील आरोपी श्री.कुणाल मनोहर कविकर यांनी तक्रारदार यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी 5,000/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष केली असून 5,000/-रुपये लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लागलीच सापळा कारवाई दरम्यान महानगर पालीका झोन क्र 07, छत्रपती संभाजीनगर परिसरात सदरची लाच रक्कम आरोपी श्री.कुणाल मनोहर कविकर, वय 27 वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी, रा.प्लॉट क्र 102, गजानन नगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर. यांनी स्वत: स्विकारली आहे. सबब कुणाल मनोहर कविकर, वय 27 वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी, रा.प्लॉट क्र 102, गजानन नगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर यांनी ते काम करत असलेल्या कार्यालयातील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन तक्रारदाराचे यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र काढुन देतो म्हणुन लाचेची रक्कम स्वीकारली म्हणुन त्यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 (अ) प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

फिर्याद दिली सही.

PSE
डिओ अधिकारी
पो.स्टे. जवाहरनगर
छत्रपती संभाजीनगर